# वसई-विरार शहर महानगरपालिका
## दिव्यांग कल्याण विभाग

दि.२३/०९/२०२२

**<u>प्रेसनोट</u>**

**महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग व्यक्तींना महानगरपालिकेच्या विविध योजनांचा लाभ मिळणे बाबत**

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, महानगरपालिकेकडून दिव्यांग व्यक्तींसाठी कार्यान्वित असलेल्या विविध योजनांचे लाभ महानगरपालिकेच्या दिव्यांग कल्याण विभागामार्फत संबंधितांना देण्यात येत आहेत. या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी संबंधित लाभार्थ्यांनी तसेच या अगोदरपासून जे लाभार्थी या योजनांचा लाभ घेत आहेत त्यांनी देखील या चालू वर्षात (सन २०२२-२०२३) **अनुदान मिळण्यासाठीचे संबंधित अर्ज (फॉर्म)** आवश्यक कागदपत्रांसह भरावयाचे आहेत. सदर योजनांचे अर्ज (फॉर्म) आपणांस महानगरपालिकेच्या नजीकच्या **प्रभाग समिती कार्यालयात** कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळता) उपलब्ध होतील. तसेच सदर अर्ज(फॉर्म) आवश्यक कागदपत्रांसह संबंधित प्रभाग समिती कार्यालयात लवकरात लवकर जमा करावे.

**दिव्यांग कल्याण विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**